# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 09/10/2023 (सोमवार) दुपार

---

### घरफोडी

**पो.स्टे. सावनेर** :– अंतर्गत ०२ किमी अंतरावर वार्ड क्र. ८ नाईक लेआउट शिव मंदीर जवळ सावनेर येथे दिनांक ०७/१०/२०२३ चे दुपारी १५.०० वा. पासुन ते दिनांक ०८/१०/२०२३ चे सकाळी १०.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– विजय झापरदेव सुके, वय ५५ वर्ष, रा. वार्ड क्र. ८ नाईक लेआउट शिव मंदीर जवळ सावनेर हे काही कामानिमित्याने बाहेर गावी गेले असता घराला लॉक लावून गेले होते व परत आले असता घराचे लॉक तुटलेले दिसले व घराचे आत प्रवेश केला असता घरातील सामान अस्ताव्यस्त दिसले व कपाटातील ठेवलेले १) सुई धागा पॅटर्नचे ६ ग्रॅम सोन्याचे कानातले किंमती १५०००/–रू २) नाकातील १ ग्रॅम सोन्याची नथनी अंदाजे २०००/–रू ३) २५ ग्रॅम चांदिच्या तोरडया अंदाजे ५०००/–रू ४) ४०००/–रू नगदी असा एकुण २६०००/–रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने स्वत:चे आर्थीक फायद्यासाठी चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार राजेश हावरे, मो. नं. ९९२३३६५६२२ हे करीत आहे.

### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक

**पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत ०३ किमी अंतरावर बोरडा टोल नाका येथे दिनांक ०८/१०/२०२३ चे ०१.१५ वा. दरम्यान कन्हान पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, मनसर येथुन जबलपुर नागपुर हायवे रोडनी आयसर वाहन क्र. MH-40/CD-1893 ने अवैधरित्या जनावरे कत्तली करीता निर्दयतेने वाहनामध्ये भरून वाहतुक करीत आहे. अश्या मिळालेल्या विश्वसनीय खबरेवरून स्टाफ रवाना होवुन बोर्डा टोल नाका कन्हान येथे नाकांबदी केली असता एक आयसर वाहन क्र. MH-40-CD-1893 हायवेने येत असल्याचे दिसले असता सदर वाहनास थांबण्याचा ईशारा केला सदर वाहन थोडया अंतरावर जावुन थांबले कन्हान पोलीस लगेच वाहनाच्या मागे गेले असता त्यामधील **आरोपी नामे– १) साकिर खान नझीम खान, वय २६ वर्ष रा. जनगखारी पोस्ट धोबीसरा त. बरघाट जिल्हा सिवनी २) तुलशीदास तुलाराम भलावी वय ३४ वर्ष रा. भिसापुर पोस्ट चंद्रपुर त. कुरई जि. सिवनी** दोन ईसम पोलिसांना पाहुन चालक व कंटेनर सोडुन पळु लागले असता त्यांना स्टाफच्या मदतीने पाठलाग केला असता पकडले. विचारपुस दरम्यान त्यांनी सांगितले की फरार आरोपी ३) जिया खान रा. सिवनी याचे सांगणेवरून दोन्ही आरोपीं जनावरांची वाहतुक करीत असल्याचे सांगितले. सदर वाहनाची पाहणी केली असता सदरचे वाहन हे काळया रंगाच्या प्लास्टीकच्या ताळपत्रीने झाकलेले दिसले एकुण २२ काळया रंगाचे म्हशी १० नर जातीचे म्हशी प्रत्येकी किमंती १५०००/– एकुण १,५०,०००/–रु, १२ मादा जातीचे म्हशी किमंती प्रत्येकी १५०००/–रू. प्रमाणे १,८०,०००/– रू व आयसर वाहन क्र. MH-40-CD-1893 वाहन किमंती १०,००,०००/– रू एकुण किमंती १३,२०,०००/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करून गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर प्रकरणी सरकार तर्फे फिर्यादी पोलीस नायक आशिक कुमरे ब. नं. ८६१ पोलिस स्टेशन कन्हान यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे वरील आरोपीविरुध्द कलम ११ (१) (a) (d) (e) (f) (i) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा १९६० सहकलम ५(a)(b) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९९५ सहकलम १०९, ३४ भा.द.वि कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपी क्र. ०१) व २) यांना अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार गणेश पाल ब. नं. ३६० मो. नं. ९५५२५१२६८ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**